पनवेल (प्रतिनिधी) व्यायामामुळे शरीर सुदृढ व मन प्रसन्न राहते, त्यामुळे प्रत्येकाने व्यायाम करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी देवद येथे केले. लोकनेते रामशेठ ठाकूर व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावतीने ०१ लाख ७५ हजार रूपयांचे व्यायाम साहित्य देवून देवद (व्दारकानगरी बिल्डिंग) येथे उभारण्यात आलेल्या सुसज्ज व्यायामशाळेचे उदघाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते नुकताच संपन्न झाले.

यावेळी व्यायामशाळेकरिता जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल हरिश्चंद्र वाळकू वाघमारे यांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी लोकनेते रामशेठ ठाकूर बोलत होते. ते पुढे म्हणाले की, धावपळीच्या या युगात माणूस व्यायाम आणि आहाराकडे दुर्लक्ष करीत चालला आहे त्यामुळे त्याला प्रकृती बिघडण्याच्या काळजीने व्यापले आहे. शरीर चांगले असेल तर कोणतेही काम करणे सहज शक्य होते त्यामुळे प्रत्येक तरूणाने व्यायाम करून आपले शरीर निरोगी ठेवावे असे सांगून ही व्यायामशाळा येथील तरूणांसाठी वरदान ठरेल असा विश्वासही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यावेळी व्यक्त केला.

या कार्यक्रमास ज्येष्ठ कार्यकर्ते किशोर सुरते, जगदिश एच. वाघमारे, प्रमोद भिंगारकर, किरण धुरंधर, वासुदेव वाघमारे, सचिन वाघमारे, प्रभाकर सोनावणे, संजय पाटील, जगदिश डी. वाघमारे, अनिल भोईर, तुकाराम फडके, अजित फडके, तुकाराम म्हात्रे, सिवदास वाघमारे, राहुल वाघमारे, प्रविण वाघमारे, सतिश वाघमारे, विशाल वाघमारे, शरद राऊत, रविंद्र भोईर, रोशन ठोकल, भूषण वाघमारे, मोहन फडके, मनोज वाघमारे, रविंद्र भोईर, सुभाष वाघमारे, किरण वाघमारे, विष्णू ठोकल, सुरेश वाघमारे, लहु वाघमारे, दिलीप वाघमारे, निखील वाघमारे, राजेंद्र पाटील, विलास ठोकल, चेतन सुरते, राजेंद्र ठोकल, शशिकांत वाघमारे, प्रेम वाघमारे, संतोष वाघमारे, सम्राट वाघमारे, सुरज सालसकर, सनी पाटील आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.